झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)

**मुख्य कार्यालय** : चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन, ई-स्क्वेअर जवळ,
अशोक नगर, गणेशखिंड रोड, शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०-६९०६७९००, ६९०६७९१८
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in


दि.२९/०४/२०२६

# जाहीर निवेदन

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व झोपडपट्टी मिळकती संदर्भातील मा.उच्च न्यायालय, मुंबई व शिखर निवारण समिती बांद्रा मुंबई येथे दाखल होणा-या न्यायालयीन प्रकरणांमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र पुणे तर्फे बाजू मांडण्याकरीता ॲडव्होकेट पॅनलवर विधी तज्ञांची सेवा उपलब्ध करून घेण्यात येणार आहे. त्यानुषंगाने, पात्र उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहे. त्याबाबत कार्यालयाच्या www.srapune.gov.in या संकेतस्थळावर दि.२९/०४/२०२६ रोजी सविस्तर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून उपरोक्त पदांकरीता सादर करावयाच्या अर्जाचा नमुना सदर संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दि.०६/०५/२०२६ पर्यंत आहे.

(राजेश जाधव)
तहसीलदार
(आस्थापना / प्रशासन)
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे

# जाहिरात

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
## पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई व मा. शिखर तक्रार निवारण समिती, बांद्रा, मुंबई येथे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड, पुणे यांचे विरूद्ध दाखल होणाऱ्या प्रकरणांमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या वतीने बाजू मांडणेकामी, प्रतिज्ञापत्र/लेखी म्हणणे सादर करणेकामी तसेच महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निमूर्लन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ अंतर्गत कायदे विषयक बाबींबाबत कायदेशीर सल्ला देणेकरिता ॲडव्होकेट पॅनेल वर विधी तज्ञांची करार पध्दतीने ३ वर्षाच्या कालावधीकरीता मानधन तत्वावर सेवा उपलब्ध करावयाची आहे. त्याकरीता प्राधिकरणाच्या ॲडव्होकेट पॅनेलवर कार्यरत होण्यास इच्छुक व पात्र उमेदवारांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या कार्यालयात अर्ज सदर जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ५ (सुट्टीचे दिवस वगळून) दिवसांच्या आत कार्यालयीन वेळेत सादर करावेत.

**मा. उच्च न्यायालय, मुंबई व मा. शिखर तक्रार निवारण समिती, बांद्रा, मुंबई येथे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणेच्या वतीने पॅनेलवर काम करणेकामी उमेदवारांसाठी सर्वसाधारण अटी व शर्ती खालीलप्रमाणे असतील :-**

१. अर्जदार हा भारताचा नागरिक असावा.
२. मान्यता प्राप्त विद्यापीठाची विधी शाखेची पदवी धारण केलेली असावी.
३. अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास अर्जदाराचे वय किमान ३३ वर्ष असावे.
४. अर्जदार यांनी वकीली व्यवसायाची सनद धारण केलेली असावी व अर्जदारास मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील वकिली व्यवसायाचा किमान १० ते १५ वर्षांचा अनुभव असावा.
५. अर्जदारास मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
६. अर्जदारास प्रामुख्याने महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निमूर्लन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणेसाठी विकास नियंत्रण नियमावली, २०२२, विशेष नियमावली, २०१४, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६, महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६, फौजदारी व दिवाणी प्रक्रिया संहिता व इतर प्रचलित कायद्यांचे पुरेसे ज्ञान व संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
७. निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना या कार्यालयाच्या पॅनेलवर विशेष अटी व शर्तींवर कार्यरत होण्यास अनुमती देण्यात येईल.

<u>अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे :-</u>

१) विहित नमुन्यातील अर्ज,
२) शैक्षणिक अर्हते संदर्भात सर्व गुणपत्रके व प्रमाणपत्रे, (सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती सादर कराव्यात) व बार कौन्सिलकडील नोंदणी प्रमाणपत्र.
३) वयाच्या पुराव्याकरिता जन्म दाखला, पॅनकार्ड अथवा माध्यमिक शाळा उत्तीर्ण प्रमाणपत्र अगर समकक्ष पुरावा.

४) अर्जदाराने त्यांचे अनुभवा बाबतचे स्व-साक्षांकित घोषणापत्र सादर करावे.

५) ज्या वकील संघाचे सभासद असतील त्या वकील संघाच्या वकीली व्यवसायाचा अनुभवाचा दाखला.

६) अर्जदाराविरूद्ध कोणत्याही न्यायालयात फौजदारी गुन्हा दाखल नाही किंवा बार कौन्सिल मार्फत कोणतीही शिस्तभंग कारवाई झालेली नाही याबाबतचे हमीपत्र.

<u>निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया :-</u>

१) प्राप्त अर्जांची छाननी करून मुलाखतीसाठी पात्र/अपात्र उमेदवारांची यादी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणेच्या www.srapune.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल.

२) प्राप्त अर्जांची छाननी उमेदवाराची शैक्षणिक अर्हता, कामाचा अनुभव व झोपुप्रा अधिनियमातील कामकाज व इतर तद्अनुषंगिक बाबींच्या आधारे करण्यात येईल. त्यास अनुसरुन त्यांचे गुणांकन केले जाईल व विशिष्ट गुणांकनाच्या वरील उमेदवारांनाच मुलाखतीसाठी निमंत्रित केले जाईल.

३) अर्जदारांची निवड ही मुलाखतीमधील गुणांच्या आधारे करण्यात येईल.

४) मुलाखतीस येताना मुळ कागदपत्रे आणणे आवश्यक आहे.

५) ॲडव्होकेट पॅनेल निवडीसाठी गठीत केलेल्या समितीमार्फत मुलाखतीद्वारे उमेदवारांची निवड केली जाईल. मुलाखतीचे गुणांकन करताना विचारात घ्यावयाच्या बाबी व कोणत्या बाबीस किती गुण द्यावेत हे ठरविण्याचा तसेच विहित पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून योग्य उमेदवार निवडीबाबत संपूर्ण अधिकार निवड समितीस राहतील.

६) ॲडव्होकेट पॅनेलवर निवडीची प्रक्रिया कोणत्याही स्तरावर स्थगित करणे/ तहकूब करणे/ रद्द करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचेकडे राखीव राहतील.

**अ) मा. उच्च न्यायालयातील प्रकरणे हाताळण्यासाठी ॲडव्होकेट पॅनेल वरील निवड केलेल्या वकिलांना खालीलप्रमाणे वकिल फी अनुज्ञेय राहील.**

| अ.क्र. | तपशील | वकील फी |
|---|---|---|
| १. | मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका, जनहित याचिका, दिवाणी पुनर्विलोकन/पुनर्निरिक्षण अर्ज, आदेशावरून अपिल, दुसरे अपिल व इतर दाखल प्रकरणांमध्ये हजर होऊन प्रकरण अंतिम निकाली निघेपर्यंत युक्तीवाद करणे. | रू. ४००००/- |
| २. | प्राधिकरणाच्या कामकाजासंदर्भात अभिप्राय | रू.४०००/- प्रति प्रकरण |
| ३. | प्राधिकरणाच्या वतीने अंतरिम अर्ज दाखल करणे/शपथपत्र | रू. १००००/- |

| | | |
|---|---|---|
| | देणे/युक्तीवाद करणे | |
| ४. | न्यायालयीन प्रकरणांमध्ये उत्तरादाखल पहिले प्रतिज्ञापत्र दाखल करणे. | रू. ५०००/- |
| ५. | आवश्यकतेनुसार अतिरिक्त प्रतिज्ञापत्र दाखल करणे (त्यापुढील सर्व प्रतिज्ञापत्रापोटी) | रू. ५०००/- |
| ६. | अंतरिम अर्जावर म्हणणे सादर करणे/शपथपत्र देणे/युक्तीवाद करणे | रू. २५००/- |
| ७. | क्लार्क फी, झेरॉक्स इ. साठी येणारा अनुषंगिक खर्च | रू. ७५००/- |
| | एकूण देय फी | रू. ७०,०००/- |

ब) मा. शिखर तक्रार निवारण समिती व स्लम ट्रिब्युनल येथील दाखल प्रकरणे हाताळण्यासाठी ॲडव्होकेट पॅनेल वरील निवड केलेल्या वकिलांना खालीलप्रमाणे वकिल फी अनुज्ञेय राहील.

| अ.क्र. | तपशील | वकील फी |
|---|---|---|
| १. | मा. शिखर तक्रार निवारण समिती व स्लम ट्रिब्युनल, मुंबई येथे दाखल झालेल्या प्रकरणी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या वतीने वकीलपत्र दाखल करून हजर होणे, शपथपत्र दाखल करणे, युक्तीवाद करणे, कागदपत्रे दाखल करणे इ. म्हणजेच प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत सर्व कामकाज पाहणे. | रू. ३२,५००/- |
| २. | त्रयस्थ पक्षकाराच्या अतिरिक्त अर्जावरील म्हणणे देणे, शपथपत्र देणे, युक्तीवाद करणे, इ. (एक किंवा अनेक प्रकरणी) | रू.१०,०००/- |
| ३. | क्लार्क फी, झेरॉक्स इ. साठी येणारा अनुषंगिक खर्च | रू. ७५००/- |
| | एकूण देय फी | रू. ५०,०००/- |

पॅनल वर नियुक्त वकिलांचे कर्तव्ये, जबाबदाऱ्या व वकील फी अदा करणेच्या संदर्भात अनुषंगिक बाबी खालील प्रमाणे राहतील :-

i. उपरोक्त प्रमाणे निश्चित केलेली फी सर्वसमावेशक असून न्यायालयीन प्रकरण अंतिमत: निकाली निघाल्यानंतर देण्यात येइल, आणि कॉन्फरन्स फी किंवा अन्य कोणतीही फी स्वतंत्रपणे देय नसेल.

ii. संबंधितांने मा. उच्च न्यायालय, मुंबई/मा. शिखर तक्रार निवारण समिती, बांद्रा, मुंबई येथील अंतिम आदेशाची प्रत देयकासोबत जोडणे आवश्यक राहिल.

iii. झोपुप्रामार्फत नियुक्त विधिज्ञांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी झोपुप्रा पुणे/विधी अधिकारी झोपुप्रा., पुणे आणि संबंधित विभाग प्रमुखांशी सल्ला मसलत करणे व न्यायालयीन निर्देश आदेश अवगत करणे आवश्यक असेल.

iv. पॅनेलवर असताना वकिलाने झो.पु.प्राधिकरणाच्या विरोधात कोणत्याही व्यक्तीची किंवा संस्थेची केस घेऊ नये.

v. झो.पु. प्राधिकरणाशी संबंधित सर्व कागदपत्र, माहिती आणि धोरणात्मक बाबींची गोपनियता राखणे बंधनकारक आहे.

vi. प्रत्येक सुनावणीनंतर केसच्या प्रगतीबाबत अहवाल प्राधिकरणाच्या विधी विभागाला देणे आवश्यक आहे.

vii. जर वकिलाने कर्तव्यात कसूर केली, चुकीची माहिती दिली किंवा प्राधिकरणाचे नुकसान होईल असे कृत्य केले तर प्राधिकरण कोणतीही पूर्वसुचना न देता अशा पॅनल ॲडव्होकेटची नियुक्ती रद्द करण्याचा सर्वस्वी अधिकार या प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहील. अशा प्रकरणी निर्माण होणाऱ्या दायित्वास संबंधित वकील जबाबदार राहतील.

viii. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण कोणत्याही कारणाशिवाय वकिलाचे पॅनेल सदस्यत्व रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवते.

ix. पॅनेल सदस्यांचा कालावधी त्यांच्या नियुक्तीपासून ३ वर्षाचा असून हा कालावधी समाधानकारक कामगिरीवर अवलंबून असून प्राधिकरण तो वाढवू किंवा कमी करू शकते.

अर्जदारांना सर्वसाधारण सूचना :-

१. पॅनल ॲडव्होकेटकरिता करावयाच्या अर्जाचा नमुना पुणे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांच्या www.srapune.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२. सदर अर्जात अर्जदार यांनी त्यांचे संपूर्ण नाव पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता, पिनकोड नंबर, भ्रमणध्वनी/दूरध्वनी क्रमांक, ई-मेल पत्ता, शैक्षणिक अर्हता, अनुभव इ. विषयक माहिती आवश्यक त्या साक्षांकित प्रतीसह सादर करणे आवश्यक आहे.

सतीशकुमार खडके (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे यांचे पॅनलवर मा.उच्च न्यायालयातील प्रकरणे हाताळण्यासाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या पॅनल ॲडव्होकेटकरिता अर्जाचा नमुना.

| | | |
|---|---|---|
| १. | नाव | |
| २. | कायमस्वरूपी पत्ता व संपर्क क्र. | |
| ३. | ईमेल आयडी. | |
| ४. | जन्मदिनांक | |
| ५. | शैक्षणिक अर्हता | |
| ६. | विद्यापीठाचे नाव | |
| ७. | अनुभव | |
| ८. | बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा यांचेकडील धारण केलेली सनद दिनांक. | |
| ९. | मा. उच्च न्यायालयासमोर चालविलेल्या प्रकरणांचे स्वरूप व संख्या. | |
| १०. | अन्य न्यायालयापुढे प्रकरण चालविले असल्यास त्याचा तपशील. | |
| ११. | गृहनिर्माण विभागाकडील शिखर तक्रार निवारण समितीपुढे प्रकरण चालविले असल्यास त्याचा तपशील. | |
| १२. | इतर शासकीय कार्यालयातील पॅनेलवर नियुक्त असल्यास त्याचा तपशील. | |

स्थळ : --------------

दिनांक : -----------

-------------------------

अर्जदाराची नाव व स्वाक्षरी

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे यांचे पॅनलवर मा.शिखर तक्रार निवारण समिती, बांद्रा, मुंबई येथील प्रकरणे हाताळण्यासाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या पॅनल ॲडव्होकेटकरिता अर्जाचा नमुना.

| | | |
|---|---|---|
| १. | नाव | |
| २. | कायमस्वरूपी पत्ता व संपर्क क्र. | |
| ३. | ईमेल आयडी. | |
| ४. | जन्मदिनांक | |
| ५. | शैक्षणिक अर्हता | |
| ६. | विद्यापीठाचे नाव | |
| ७. | अनुभव | |
| ८. | बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा यांचेकडील धारण केलेली सनद दिनांक. | |
| ९. | मा. उच्च न्यायालयासमोर चालविलेल्या प्रकरणांचे स्वरूप व संख्या. | |
| १०. | अन्य न्यायालयापुढे प्रकरण चालविले असल्यास त्याचा तपशील. | |
| ११. | गृहनिर्माण विभागाकडील शिखर तक्रार निवारण समितीपुढे प्रकरण चालविले असल्यास त्याचा तपशील. | |
| १२. | इतर शासकीय कार्यालयातील पॅनेलवर नियुक्त असल्यास त्याचा तपशील. | |

स्थळ : --------------

दिनांक : -----------

-------------------------

अर्जदाराची नाव व स्वाक्षरी